जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१९/ 8440
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :-23 /१२/२०१९

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व

विषय :- मॅन्युअल टंकलेखन बंद करुन संगणक टंकलेखनाची मान्यता घेतलेल्या संस्थांना संगणकाची शासनमान्यता पाहुन लघुलेखन मान्यता प्रदान करणेबाबत..

संदर्भ :- महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन,संगणक टायपिंग शासनमान्य संस्थांची संघटना,मुंबई यांचे दि.२८/११/२०१९ रोजीचे, या कार्यालयास प्राप्त दि.११/१२/२०१९ रोजीचे निवेदन.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन, संगणक टायपिंग शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई यांचे मॅन्युअल टंकलेखन बंद करुन संगणक टंकलेखनाची मान्यता घेतलेल्या संस्थांना संगणकाची शासनमान्यता पाहून लघुलेखन मान्यता प्रदान करणेबाबतचे निवेदन या कार्यालयास दि.११/१२/२०१९ रोजी प्राप्त झाले आहे.

सदयस्थितीत लघुलेखन विषयाच्या मान्यता नुतनीकरण करताना उपसंचालक कार्यालय टंकलेखनाच्या मान्यतेची मागणी करत आहे. ज्या संस्थांनी शासन आदेशाची पुर्तता करुन संगणक टंकलेखन मान्यता घेतलेली आहे व मॅन्युअल टंकलेखन बंद केले आहे अशा संस्थांना लघुलेखनाची मान्यता देताना टंकलेखनाची जी.सी.सी.ची मान्यता आग्रह न धरता संगणक टंकलेखन जीसीसी-टिबीसी मान्यता पाहून लघुलेखन मान्यता / नुतनीकरण करुन देणे बाबतचे संदर्भिय निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले आहे. तरी सदरील निवेदनाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी व या कार्यालयास कळवावे.

**सोबतः- संदर्भिय निवेदनाची छायांकित प्रत.**

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

प्रत माहितीस्तवः-

महाराष्ट्र राज्य टंकलेखन व लघुलेखन संगणक टायपिंग शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई